# संगीत कलेचे भारतीय ज्ञान परंपरेतील योगदान

**सहा. प्रा. सतीश जमधाडे**
श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारीअकोला.
मो. नंबर 9822234682
Email:- satishjamdhade1@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

सर्व ललित कलेमध्ये सर्वश्रेष्ठ ललित कला म्हणून भारतीय संगीत कलेला ओळखले जाते. भारतीय संगीताला अतिशय गौरव पूर्ण इतिहास असून प्राचीन काळापासून शिक्षण पद्धतीमध्ये गुरुचे स्थान हे सर्वश्रेष्ठ स्थान मानल्या गेले आहे. संगीत शिक्षा पद्धतीमध्ये तर गुरु शिष्य परंपरेला शिक्षणाची सर्वश्रेष्ठ पद्धती म्हणून मान्यता प्राप्त आहे. भारतात आर्यानच्या आगमनापासूनच वैदिक युगाला प्रारंभ झाला. वैदिक युगापासून तर मध्य काळापर्यंत ही कला गुरु शिष्य पद्धतीने जतन केल्या जात होती. वैदिक काळामध्ये आश्रम व्यवस्था होती. ब्रह्मचर्य आश्रम, गृहस्थ आश्रम, वानप्रस्थ आश्रम, संन्यास आश्रम. यापैकी ब्रह्मचर्य आश्रमामध्ये गुरुद्वारे शिक्षा घेण्याची पद्धती होती. संगीताची शिक्षा गुरुमुखी दिली जायची. गुरुगृही राहून, गुरुची सेवा करून, सर्व नियमांचे पालन करून, विद्यार्थी विद्या ग्रहण करत असे. तेवढ्याच आत्मीयतेने शिष्याला ज्ञानदान करीत होते. संगीत ही गुरुमुखी विद्या आहे. प्राचीन काळापासून पिढ्यानपिढ्या ती मौखिक पद्धतीनेच जतन केली गेली. संगीत शिक्षण पद्धतीमध्ये दिक्खिया, सिक्खिया, परखिया म्हणजेच गुरुमुखातून निघालेले लक्षपूर्वक ऐकणे, त्याचा अभ्यास करणे, आणि आपण आत्मसात केलेले ज्ञान गुरूकडून परखून घेणे. यालाच विद्वानांनी दीक्षा, शिक्षा आणि परीक्षा असेही संबोधले आहे.

वैदिक काळामध्ये संगीताच्या तीनही शाखा म्हणजे गायन वादन व नृत्य यांचे शिक्षण स्त्री-पुरुषांसाठी समान होते. संगीताची पवित्रता जपण्यासाठी त्याला धर्माची जोड ही देण्यात आली होती, त्याचा परिणाम संगीताने मानवाला कधी अनैतिकते कडे झुकू दिले नाही. गुरु हे उदारमतवादी होते त्यामुळे शिष्याला ज्ञान देतांना हातचे राखून ठेवल्या जात नसे. हळूहळू परिस्थिती बदलत गेली पौराणिक काळापर्यंत संगीतातील उदारता जाऊन त्याला संकुचित रूप प्राप्त झाले. परमार्थपेक्षा स्वार्थी वृत्ती वाढीस गेली.

**बदलत गेलेल्या शिक्षण पद्धतीचे ज्ञान परंपरेत योगदान :-**

1. **आश्रम पद्धती :-**

वैदिक काळापासूनच आश्रम पद्धतीची सुरुवात झाली. आश्रम पद्धतीचे शिक्षण म्हणजे प्रत्यक्ष गुरुमुखी शिक्षण ग्रहण करणे. या पद्धतीमुळे सिना – ब - सीना तालीम विद्यार्थ्यांना मिळत होती. या शिक्षण पद्धतीत शिष्यवर्गाला शिक्षणासोबतच मूल्य शिक्षणाचे सुद्धा धडे दिले जायचे. सकाळी गुरु आधी

Research Hub International Journal

लवकर उठणे, आश्रमातील सर्व कामे करणे, नंतर गुरु समक्ष बसून ज्ञानग्रहण करणे, प्राप्त झालेल्या ज्ञानाचे चिंतन करणे, गुरुची सेवा करणे, या सर्वच पद्धतीमुळे ज्ञानसाधना अतिशय प्रामाणिक पणे केली जायची. संगीत साधना ही त्याला अपवाद नाही. संगीताचे असे शिस्तबद्ध ज्ञान ग्रहण केल्याने, शिष्य गुरु प्रमाणेच विद्येत पारंगत होत असे, परिणामी संगीत कलेचाही विकास झपाट्याने झाला.

**2. घराणी पद्धती :-**

मध्य युगामध्ये मोगल आक्रमणामुळे संगीतावर संमिश्र परिणाम झाला. काही शासकांनी संगीताला राजाश्रय दिला तर काहींनी संगीतावर बंदी आणली. अनेक संगीतकारांच्या कत्तली केल्या गेल्या. त्यामुळे संगीत कला जिवंत ठेवणे कठीण जाऊ लागले. संगीतकारांनी उपजीविकेसाठी राज्यांचा आश्रय घेतला. ज्या भागांमध्ये ते स्थायिक झाले त्यांच्या नावावरूनच त्यांचे घराणे निर्माण झाले. उदाहरणार्थ ग्वाल्हेर घराणा, आग्रा घराण, जयपुर घराना, बनारस घरांना लखनऊ घरांना, रामपूर सहसवन घराणा इत्यादी. आणि या घराण्यामधूनच घरंदाज शिक्षण पद्धतीला सुरुवात झाली. त्या त्या घराण्यातील शिष्य आपल्या घराण्याचा वारसा समोर नेत राहिले. संगीत शिक्षण पद्धतीमध्ये घराणेदार संगीत शिक्षण पद्धतीचा मोलाचा असा वाटा आहे. आज घराणा पद्धत फारशी प्रचलित दिसून येत नाही. तरी कमी अधिक प्रमाणात का होईना काही गुरूकडून आजही शिष्यांना त्यांच्या घराण्यानुसार शिक्षण दिल्या जाते.

**3. शैक्षणिक संस्था :-**

संगीताचा प्रचार व प्रसार करण्याचे श्रेय महाराष्ट्रातील दोन विभूतींना जाते. ते म्हणजे पंडित विष्णू नारायण भातखंडे आणि पंडित विष्णू दिगंबर पुरस्कार. या दोन्ही विष्णूंनी भारतभर प्रवास करून संगीत कला उद्धारीत केली. पंडित भातखंडे यांनी लखनऊ मध्ये मॉरियस म्युझिक कॉलेज, ग्वाल्हेर मध्ये माधव संगीत महाविद्यालय, त्याचप्रमाणे बडोद्यामध्ये म्युझिक कॉलेजची स्थापना केली. त्याचप्रमाणे पंडित पलुस्करांनी लाहोर मध्ये गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. या शैक्षणिक संस्थांनी संगीताच्या प्रचार प्रसाराची मुहूर्तमेढ रोवली. यानंतर संगीताच्या अनेक संस्था उघडण्यात आल्या त्यामधून संगीत शिक्षण सर्वांसाठीच खुले झाले.

**4. शाळा व महाविद्यालय :-**

आज संगीताचे शिक्षण देणाऱ्या अनेक शाळा महाविद्यालय स्थापन झालेले आहेत. ज्यांच्या अभ्यासक्रमामध्ये संगीत विषयाच्या अभ्यासक्रमाचा सुद्धा अंतर्भाव होतो. अनेक विद्यार्थी या शाळा महाविद्यालयांमधून संगीताची पदवी घेऊन संगीत शिक्षक म्हणून काम करीत आहेत. विविध ठिकाणी संगीताचे प्रसारक म्हणून काम करीत आहेत. अनेक कारणांमुळे पण गुरुकुल पद्धतीमध्ये किंवा घराणा पद्धतीमध्ये ज्याप्रमाणे संगीताची शिक्षण होत होते तशा पद्धतीमध्ये शाळा व महाविद्यालयांमध्ये शिक्षण

Research Hub International Journal

होताना दिसून येत नाही. तरीसुद्धा आज संगीत शिक्षण घेताना शाळा व महाविद्यालया शिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नाही.

**5. आधुनिक शिक्षण पद्धती :-**

प्राचीन काळामध्ये संगीत शिक्षणाचा व्यवसायिक दृष्टिकोन नव्हता . पण आज संगीताला व्यावसायिक रूप आल्याने आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये गुरु शेजारी बसून ज्ञान घेणे या सर्वांचा अभाव दिसून येतो. अभ्यासक्रमातील असलेली बंधने, वेळेचे बंधन या सर्वांमुळे गुरु शिष्य परंपरेला तडा जाऊन एक नवीन पद्धती निर्माण झाली. आज युट्युब च्या माध्यमातून अनेक संगीत शिक्षक आपल्या विषयाचे व्हिडिओ बनवून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देतात. आणि विद्यार्थीही असे व्हिडिओ पाहूनच शिकण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये विद्यार्थ्याला अनेक शिक्षकांचे मार्गदर्शन मिळून विविध पद्धतीचे शिक्षण घेता येते. परंतु त्याच्याकडून होत असलेल्या चुका ह्या गुरुच्या समोर दिसत नसल्यामुळे त्या चुका तशाच राहून चुका सहित ज्ञान आत्मसात केल्या जाते.

**ग्रंथकारांचे योगदान :-**

भारतीय ज्ञानपरंपरेत संगीत ग्रंथकारांचे सुद्धा मुलाचे योगदान दिसून येते. संगीत शास्त्रांवर लिहिलेल्या विविध ग्रंथांमुळे नवीन अभ्यासकाला ज्ञान देणे व घेणे सोपे झाले आहे. ज्यामध्ये भरताचे नाट्यशास्त्र, मतंगाचे बृह देशी, नारदाची नारदीय दीक्षा, संगीत मकरंद, जय देवाचे गीत गोविंद, शारंग देवाचे संगीत रत्नाकर, रामा मात्त्याचे स्वरमेल कलानिधी, मानकुतूहल, राग तरंगिनी, अहोबलाचे संगीत पारिजात, इत्यादी ग्रंथ त्याचबरोबर आधुनिक संगीतग्रंथ आणि ग्रंथकारांचे सुद्धा योगदान महत्त्वाचे ठरते. आज अनेक संगीत तज्ञ, शोधार्थी हे सुद्धा संगीत क्षेत्रामध्ये विविध विषयावर शोध घेऊन आपले शोध निबंध तयार करीत आहेत. त्यांनी केलेल्या सखोल कार्याचा आणि त्यांच्या शोध ग्रंथाचा देखील उपयोग ज्ञान परंपरेत अमूल्य असा वाटा उचलत आहे. येणाऱ्या पिढीसाठी हे सर्व संगीतग्रंथ मार्गदर्शक आणि उपयुक्त असेच ठरले आहे आणि ठरणार आहेत.

**स्वर लिपीकारांचे योगदान :-**

पिढ्यान पिढ्या मौखिक पद्धतीने जतन केलेली संगीतकला नष्ट होऊ नये म्हणून स्वर लिपीची पद्धत तयार करून रागांच्या अनेक बंदिशी लिपीबद्ध करून संगीताच्या अध्ययन व अध्यापनामध्ये सिंहाचा वाटा उचलला तो संगीत स्वर लिपीकारांनी. यामध्ये पंडित भातखंडे व पंडित पलुस्कारांची लिपी व त्यांचे योगदान हे खूप महत्त्वाचे ठरते. आज त्यांनी लिपी बद्ध केलेल्या अनेक बंदीशी संगीत शिक्षकांसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त आणि मोलाच्या ठरल्या आहेत. अशा पद्धतीने संगीत कलेच्या समृद्ध अशा परंपरेचा भारतीय ज्ञान परंपरेत मोलाचा असा वाटा आहे.

Research Hub International Journal

**संदर्भ ग्रंथ :-**


- वसंत, संगीत विशारद, हाथरस प्रकाशन.
- जोशी, उमेश, भारतीय संगीताचा इतिहास, मानसरोवर प्रकाशन.
- किरण फाटक,संगीत निबंधावली
- वा.ह. देशपांडे, घरंदाज गायकी


Research Hub International Journal